**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० जानेवारी,२०२५

**संदर्भ :-** १) महिला व बाल विकास विभाग, शा.नि. क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६, दि. ०२.०२.२०२३.
२) महिला व बाल विकास विभाग, शा.नि. क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६, दि. ०२.०५.२०२३, दि. ११.०८.२०२३, दि.१३.१२.२०२३ व दि.२७.१२.२०२४
३) महिला व बाल विकास विभाग, शासन पत्र क्रमांक एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६, दि. ०९.०९.२०२४

**प्रस्तावना:-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेंतर्गत अंगणवाडयांमधील अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस या मानधनी कर्मचा-यांच्या नियुक्तीसंदर्भातील अटी शर्ती संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ०२.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत. तदनंतर सदर शासन निर्णयामधील अटी शर्तींमध्ये संदर्भाधीन क्र. २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयांन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची सरळसेवेने नियुक्ती करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०२.०२.२०२३ मधील परिशिष्ट "अ" नुसार गुणांकन करून कार्यवाही करण्यात येत होती. त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची गुणांकन करून सरळसेवेने नियुक्ती करण्याकरिता संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ०२.०२.२०२३ शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टानुसार अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची सरळसेवेने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्ती संदर्भातील सदर शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या सुधारणांव्यतिरिक्त उर्वरित अटी शर्ती ह्या संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ०२.०२.२०२३ व तदनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार लागू राहतील.

३. अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांच्या सरळसेवेने पदभरतीस संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन पत्र दिनांक ०९.०९.२०२४ अन्वये दिलेले स्थगिती आदेश रद्द करण्यात येत आहेत. त्यानुसार अंगणवाडी

Scanned with OKEN Scanner

सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची रिक्त पद भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

४. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांमधील ज्या प्रकल्पांमध्ये सदर शासन निर्णयापूर्वीच्या निकषांनुसार जाहिरात देऊन निवड समितीने निवडलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नियुक्तीचे आदेश निर्गमित केलेले आहेत, त्याचप्रमाणे निवड समितीने अंतिम केलेली गुणवत्ता पडताळणी यादी प्रकल्प कार्यालयाने प्रसिद्ध केलेली आहे, अशी प्रकरणे वगळून उर्वरित कोणत्याही टप्प्यावर स्थगित ठेवण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने जाहिरात देऊन सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०१३०१२३४२७१९३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2025.01.30 12:35:31 +05'30'

**( वि. रा. ठाकूर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई,
५) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,
७) आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१०) सर्व विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास),
११) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास),जिल्हा परिषद,
१२) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( ग्रामीण/नागरी/आदिवासी) प्रकल्प,
१३) निवड नस्ती -का-६.



Scanned with OKEN Scanner

**महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६, दिनांक ३० जानेवारी,२०२५ सोबतचे परिशिष्ट**

| बाब | एकूण गुण | अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस (किमान अर्हता १२ वी उत्तीर्ण) | |
|---|---|---|---|
| | | शैक्षणिक अर्हता | द्यावयाचे गुण |
| शैक्षणिक अर्हता | ८० गुणांपर्यंत | १) बारावी | |
| | | ८० % पेक्षा जास्त | ६० |
| | | ७०.०१ ते ८०% | ५५ |
| | | ६०.०१ ते ७०% | ५० |
| | | ५०.०१ ते ६०% | ४५ |
| | | ५०% ते ४० % | ४० |
| | | **टिप:-** ज्या उत्तीर्ण उमेदवारांना ४० % पेक्षा कमी गुण असतील त्यांना सरासरी ३५ गुण ग्राह्य धरण्यात येतील. | |
| | | २) पदवीधर | १० |
| | | ३) पदव्युत्तर | ४ |
| | | ४) डी.एड. | २ |
| | | ५) बी. एड. | २ |
| | | ६) शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असल्यास | २ |
| अतिरीक्त गुण | २० गुणांपर्यंत | | |
| विधवा /अनाथ | | | १० |
| अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती | | | ०५ |
| इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग / सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग | | | ०३ |
| अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षांचा अनुभव असल्यास | | | ०५ |



Scanned with OKEN Scanner